नि.दरखास्त नं.१४/२०२१
जालिंदर माने विरुध्द आनंदा माने वगैरे
CNR-MHSN14000969-2021

## नि.क्र. ५ वरील आदेश

दरखास्तदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिला कलम ९४ क आदेश २१ नियम ३२ व सह कलम १५१ प्रमाणे दाखल केला आहे.

२. दरखास्तदार यांचे थोडक्यात कथन असे की, ग्रामपंचायत वाकुर्डे बुद्रुक, ता.शिराळा, जि. सांगली याठिकाणी भूमापन गट नं. ३३२/1 त्याचे एकूण क्षेत्र ० हे ४०.५० आर. पोट खराब २ हे. ०२ आर त्याचा एकूण आकार ०५ रु. ०६ पै. त्यापैकी सातबारा पत्रकी नमूद हिस्सेप्रमाणे व कायदेशीर वाटपाप्रमाणे दरखास्तदार यांचे हिस्सेचे क्षेत्र ० हे. १३.५० आर. त्याचा आकार ०१ रु. ६९ पै. यासी चतुःसिमा पुढीलप्रमाणे-

पूर्वेस- खाशाबा रामचंद्र वाघ यांची मिळकत.

पश्चिमेस- ओढा.

दक्षिणेस- संतोष दत्तात्रय माने यांची मिळकत.

उत्तरेस- भिवा धोंडी माने यांची मिळकत.

येणेप्रमाणे वर्णनांकीत व चतुःसिमांकीत मिळकत ही प्रस्तुत अर्जाचा विषय असून संक्षेपाचे कारणास्तव त्यास येथून पुढे दावा मिळकत असे संबोधण्यात आले आहे.

३.        दरखास्तदार यांनी मे.दिवाणी न्यायाधीश क. स्तर शिराळा यांचे कोर्टात जाबदार यांचे पूर्वहक्कदार यांचे विरोधात रे.दि.मु.नं. १३०/२००१ हा दावा वाटपाकरीता व कायम मनाईकरीता दि. २०/१२/२००१ रोजी गुदरला होता. त्याचा निकाल दि. २७/०२/२००४ रोजी होऊन त्याची अंमलबजावणी होणेसाठी रे.द.नं. २८/२००४ रोजी दरखास्त गुदरली होती. त्याचा अंमल होणेसाठी जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे पाठविले. त्यानुसार सदरकामी दि. ०२/०४/२००५ रोजी तालुका भूमिअभिलेख यांनी दावा मिळकतीचे सरस-निरस मानाने वाटप करुन दि. २४/११/२००५ रोजी वाटप तक्ता तयार केला. त्यानुसार तहसिलदार शिराळा यांचेकडील क्र.एम.ए.जी./वाटप केस नं. १२/२००५ दि. ०९/०८/२००६ यांचेपुढे रे.दि.मु.नं. १३०/२००१ दावेतील वादी प्रतिवादी यांचे दरम्यान महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५ प्रमाणे काम चालून दि. २४/११/२००५ च्या वाटप तक्ताप्रमाणे वाटप मंजूर करणेत आलेले आहे.

४.        वरीलप्रमाणे तहसिलदार शिराळा यांनी वाटप मंजूर केल्यानंतर दावा मिळकतीचा कब्जा वि.प.नं. १ ते ५ यांचे पूर्वहक्कदार मयत आनंदा माने व वि.प.नं. ७ ते १५ यांचे पूर्वहक्कदार मयत दिनकर माने यांचेकडून काढून दरखास्तदार यांना मंडलअधिकारी शिरसी पंच व मा.गा.का. तलाठी यांचे पंचासमोर प्रत्यक्ष शेतामध्ये जाऊन हिंडून फिरुन पाहणी केली व त्याची कब्जेपट्टी तयार केली. त्यानुसार दावा मिळकत गट नं. ३३२/१ मधील क्षेत्र ० हे १३.५० आर क्षेत्राचा प्रत्यक्ष कब्जा दरखास्तदार यांना देणेत आला होता व आहे. दरखास्तदार यांना वरीलप्रमाणे वाटप व तुटक कब्जा मिळालेबाबत फेरफार नं.

७८६५ दि. २६/१०/२००६ रोजी मंजूर करणेत आला आहे. त्यानुसार दरखास्तदार यांचे नांवाचा ८अ खातेनंबर २९२ तयार करणेत आला. त्यामध्ये इतर गट नंबर सोबत दावा मिळकत गट नं. ३३२/१ मधील क्षेत्र ० हे. १३.५० आर क्षेत्र समावेश करणेत आले आहे. तसेच जाबदार यांचे पूर्वहक्कदार तसेच त्यांचे तर्फे कोणीही दरखास्तदार यांना दावा मिळकतीमधून हुसकावून लावू नये अशी निरंतर मनाई जाबदार यांचे पूर्वहक्कदार यांना झालेली आहे.

**५.** सदर मिळकत ही दरखास्तदार यांची खुद्द मालकीची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची शेतमिळकत असून दरखास्तदार यांनी सदर मिळकतीचे पश्चिम बाजूला असणाऱ्या ओढ्यावर स्वतंत्र ५ एच.पी. ची मोटर बसवून त्याचेआधारे सदर मिळकत बागायती केलेली आहे. त्याप्रमाणे दरखास्तदार शासनाच्या पाटबंधारे विभागाला नियमीत पाणीपट्टी भरतात. दरखास्तदार सदर जमीनीमध्ये सालोसाल ऊस, सोयाबीन, भात अशी बागायती पिके घेतात. सदर मिळकतीशी प्रतिवादी यांचा कोणताही व कसलाही संबंध नव्हता व अगर नाही.

**६.** दरखास्तदार यांचे वडील कोंडी विठू माने हे दि. २१/०७/१९९६ रोजी मयत झाले असून जाबदार यांनी त्यांचे नांवावरील जुन्या विद्युत कनेक्शनचा व पाणी परवाना याचा बेकायदेशीरपणे वापर करुन दरखास्तदार यांचे वर नमूद मिळकतीमधील क्षेत्रात बेकायदेशीरपणे १० एच.पी.ची मोटर बसवून त्याद्वारे सदर मिळकतीचे पश्चिम बाजूस असणाऱ्या वर नमूद ओढ्यावरुन वाकुर्डे बुद्रुक, ता.शिराळा, जि. सांगली या गांवातील काही

लोकांना भाड्याने पाणी देणेकरीता बेकायदेशीर वापर करीत आहेत व जाबदार दरखास्तदार यांना सार्वजनिक तसेच खाजगी उपद्रव करीत होता व आहे ते पूर्णपणे चुकीचे व बेकायदेशीर होते व आहे.

**७.** सदर मिळकतीमध्ये वर नमूद १० एच.पी. ची मोटर तसेच सदर मोटर चालू बंद करणेसाठी तसेच तिची देखभाल, दुरुस्ती करणेसाठी फिटींग, ॲडजेस्टमेंट करणेसाठी राजरोसपणे जाबदार यांचा व त्यांचेवतीने भाडोत्री पाणी दिलेले लोकांचा तसेच दुरुस्ती करणारे मिस्त्री यांचेमुळे सदर मिळकतीमध्ये राबता वाढून दरखास्तदार यांचे सर्वसाधारणपणे ० हे. ०५ आर शेतीचे अपरिमित नुकसान होत आहे. त्यांची कोणतीही नुकसान भरपाई जाबदार यांनी दरखास्तदार यांना दिलेली नव्हती अगर देत नाही.

**८.** दावा मिळकतीमधील पश्चिम भाग हा ओढ्यालगत असलेमुळे दावा मिळकतीला बांध बंदिस्ती नसलेमुळे पावसाळी पुराचे पाणी सदर मिळकतीमध्ये शिरते व त्यामुळे दरखास्तदार यांनी पावसाळ्यामध्ये केलेले सोयाबीन, भात, भुईमूग इत्यादी नगदी किंवा अंतरपिक यांची अत्यंत नासाडी होत असते. त्यामुळे दावा मिळकतीचे पुरापासून संरक्षण व्हावे याकरीता तसेच दरखास्तदार यांना सदर मिळकत विकसीत करावयाची आहे. त्याठिकाणी आधुनिक व यांत्रीकी पध्दतीने जमीन सपाटीकरण, बांध घालणे, माती टाकणे, पाईपलाईन करणे व सेंद्रीय खते घालणे आदी प्रकारे त्याची बांध बंदिस्त करुन सदर मिळकतीचा वर नमूद भाग योग्य त्याप्रकारे लागवडीखाली आणावयाचा आहे.

९. वरीलप्रमाणे सदर मिळकत विकसीत करावयाची झालेस जाबदार यांनी वर नमूद बसविलेले १० एच.पी. चे मोटरचा तसेच सदर मोटरसाठी विद्युत पुरवठा करणेसाठी बसविलेला खाजगी खांब व त्यावरील पेटी तसेच वर नमुद प्रमाणे राबता यामुळे दरखास्तदार यांना खाजगी व सार्वजनिक उपद्रव होत आहे. याबाबत दरखास्तदार यांनी जाबदार यांना वर नमूद १० एच.पी. चे मोटर व सदर मोटरसाठी विद्युत पुरवठा करणेसाठी बसविलेला खाजगी खांब व त्यावरील पेटी काढून घ्यावी असे वारंवार सांगून व सूचना देऊन देखील जाबदार दुर्लक्ष करीत आहेत ते चुकीचे व बेकायदेशीर आहे.

१०. जाबदार यांनी सदर मिळकतीमधून वर नमूद १० एच.पी. चे मोटर व सदर मोटरसाठी विद्युत पुरवठा करणेसाठी बसविलेला खाजगी खांब व त्यावरील पेटी काढून घ्यावी. याबाबत दरखास्तदार यांनी जाबदार यांना वकीलांमार्फत दि. १५/०५/२०२१ रोजी रजिष्टर नोटीस पाठविली. सदरची नोटीस जाबदार यांना मिळून देखील जाबदार यांनी दरखास्तदार यांची मागणी दि. ०३/०६/२०२१ रोजीची उत्तरी नोटीस पाठवून नाकारली. सबब. जाबदार यांनी सदर मिळकतीमधून वर नमूद १० एच.पी. चे मोटर व सदर मोटरसाठी विद्युत पुरवठा करणेसाठी बसविलेला खाजगी खांब व त्यावरील पेटी काढून घ्यावी याबाबत मे.कोर्टाच्या दि. २७/०२/२००४ रोजीचे कायम मनाईचे आदेशाप्रमाणे हुकूमनामेची अंमलबजावणी व्हावी. प्रतिवादी यांनी मे.कोर्टाचे कायम मनाई आदेशाचा दि. २७/११/२०१५ रोजीचे आदेशाचा भंग व अवमान केलेमुळे प्रतिवादी यांना दिवाणी तुरुंगात ठेवणेचा आदेश व्हावा. तसेच प्रतिवादी यांची मिळकत जप्त करुन त्याची विक्री करणेबाबत

योग्य ते आदेश व्हावेत अशी विनंती केली आहे.

**११.** प्रस्तुत अर्जास जाबदार नं. १ ते ३ तर्फे नि.क्र. १७ वर म्हणणे दाखल करुन त्यांनी असे कथन केले की, दरखास्तदार यांचा नि.क्र. ५ चा अर्ज व त्यामधील संपूर्ण मजकूर खोटा, चुकीचा व बेकायदेशीर असून तो या जाबदार यांना मान्य व कबूल नाही. दावा मिळकतीचे दिलेले वर्णन योग्य व कायदेशीर नाही. तसेच दिलेल्या चतुःसिमा काल्पनिक असून त्या वस्तुस्थितीप्रमाणे नाहीत. त्यामुळे वाद मिळकतीचा स्पष्ट बोध होत नाही. दरखास्तदार यांचा मूळ दरखास्त अर्ज व त्यामधील मजकुराचे अवलोकन केले असता त्यामध्ये कोणतीही सुस्पष्ट कथने व मागणी केल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रस्तुत अर्जामध्ये मागितलेल्या मागण्या व कथने ही मुळ दरखास्त अर्जामध्ये तशा आशयाची कोणतीही कथने व मागणी दिसून येत नाही. दरखास्तदार यांनी त्यांचे कथनांचे पुष्ठ्यर्थ कोणतीही आवश्यक कागदपत्रे याकामी दाखल केलेली नाहीत. दरखास्तदार यांना तथाकथीत वाटप तक्त्याप्रमाणे कोणते क्षेत्र, किती क्षेत्र, कोणत्या चतुःसिमेतील क्षेत्र मिळाले याबाबत दरखास्तदार यांनी कोणताही ठोस कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केलेला नाही. गट नं. ३३२/१ याचे एकूण क्षेत्र ०.४०.५० आर आहे. त्यामध्ये दरखास्तदार व जाबदार यांचे व्यतिरिक्त इतर सहहिस्सेदार यांचीही मालकी हक्काने कब्जेवहिवाट होती व आहे. अशापरिस्थितीत दरखास्तदार यांनी त्यांचे कथनांमध्ये त्यांना त्या तथाकथीत चुतःसिमेतील क्षेत्र वाटपात कब्जात मिळाले हे खोटे व चुकीचे आहे. दरखास्तदार यांचे सदर गट नं. ३३२/१ यामधील त्यांनी दिलेल्या चतुःसिमेतील क्षेत्र त्यांना मिळाले हे धांदात खोटे व

बेकायदेशीर आहे. तसा कब्जा दरखास्तदार यांना केव्हाही मिळालेला नव्हता व नाही.

**१२.** भूमापन क्र. ३३२/१ यामध्ये सदर जाबदार यांचे पूर्वाधिकारी यांचे पासून १० एच.पी. मोटार जाबदार यांचे मालकीहक्काची होती व आहे. सदर जाबदार यांची सदर मोटार ही वाकुर्डे बुद्रुक ते पडवळवाडी या डांबरी रस्त्यापासून केवळ ५ फुटावर आहे. तसेच त्याचे विद्युत कनेक्शन सदर डांबरी रोडचे साईडपट्टीस लागून लगेचच तीन फुटावर आहे. त्यामुळे सदर जाबदार हे त्यांचे मालकीच्या सदर मोटार व विद्युत कनेक्शनचा वापर करण्यासाठी सदर डांबरी रोडवरुन जा-ये करुन वापर करीत आलेले होते व आहेत ही सर्व वस्तुस्थिती दरखास्तदार यांना प्रथमपासून माहिती असूनही ती बाब दरखास्तदार यांनी मुद्दाम जाणुन-बुजून मे.कोर्टापासून लपवून ठेवलेली आहे. जाबदार यांनी कधीही भाडयाने पाणी देऊन बेकायदेशीर वापर केलेला नाही. तसेच जाबदार यांनी दरखास्तदार यांना सार्वजनिक तसेच खाजगी उपद्रव केलेला नव्हता व नाही.

**१३.** जाबदार यांचे पूर्वहक्कदारांपासून अनेक वर्षापासून सदर मोटार व विद्युत कनेक्शन आहे त्याच ठिकाणी आहे. सदर भूमापन क्र. ३३२/१ मधील सहहिस्सेदार श्री. वसंत बाळू माने यांनी त्यांचे मालकीहक्क कब्जेवहिवाटीचे ०.०२ आर क्षेत्र सदर जाबदार यांचे पूर्वाधिकारी श्री. आनंदा कोंडी माने यांना विद्युत मोटार ठेवण्याकरता दि. १०/१२/१९९८ रोजी लिहून दिलेले होते व आहे. अशाप्रकारे जाबदार यांची विद्युत मोटार कनेक्शन व त्याची जागा याचेशी दरखास्तदार यांचा कोणताही हक्क व हितसंबंध कधीही नव्हता व नाही. दरखास्तदार केवळ दिवाणी दावा नं. १३०/२००१ व दरखास्त अर्ज नं. २८/२००४ यांचे

आदेशाचा गैरफायदा घेऊन सदर जाबदार यांना व्देषापोटी नाहक त्रास देण्याचा प्रयत्न करीत आहेत. जाबदार यांचे पूर्वाधिकारी यांनी योग्य त्या पाणी पुरवठा व एम.ई.सी.बी यांच्या कार्यालयातील योग्य त्या अधिकाऱ्यांकडून रितसर परवानगी घेऊन १० एच.पी. ची मोटार व सदर मोटारीसाठी विद्युत पुरवठा करणेसाठी बसविलेला खाजगी खांब व त्यावरील पेटी बसविलेली आहे. त्यासाठी जाबदार यांचे पूर्वाधिकारी यांनी योग्य ती कागदपत्रे दिल्यानंतरच त्यांना त्याची परवानगी मिळालेली आहे. सबब दरखास्तदार यांनी मागितलेल्या मागण्या खोट्या, चुकीच्या व बेकायदेशीर असून अशा मागण्या दरखास्तदार यांना या जाबदारविरुध्द मागण्याचा कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार नव्हता व नाही. या कारणावरुनही दरखास्तदार यांचा नि.क्र. ५ चा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा असे कथन केले आहे.

**१४.** दरखास्तदारतर्फे विधीज्ञ श्री. डी. बी. शिर्के यांचा व जाबदार क्र. १ ते ३ तर्फे विधीज्ञ श्री. एन. टी. सूर्यवंशी यांचा युक्तिवाद ऐकला. जाबदार क्र. ४ व ५ विरुध्द दरखास्त एकतर्फा. दरखास्तदार व जाबदारतर्फे विधीज्ञांनी त्यांचे कथनांनुसार युक्तिवाद केला. प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुतची दरखास्त ही दरखास्तदार यांनी रे.दि.मु.नं. १३०/२००१ चे हुकूमनाम्याचे आधारे दाखल केलेली आहे. दरखास्तदार यांनी सदर केसचा न्यायनिर्णय व हुकूमनामा प्रकरणात दाखल केलेला आहे. त्यावरुन सदरचा दावा हा दरखास्तदार यांनी गट नं. ३३२/१ बरोबर इतर मिळकतींचे वाटप होऊन मिळणेसाठी व निरंतर मनाईसाठी दाखल केला होता. सदर दाव्याचा निर्णय दि. २७/०२/२००४ रोजी होऊन दावा मिळकतीमध्ये वादींचा ११/५० हिस्सा ठरवून प्रतिवादींनी वादींना दावा

मिळकतीतून हुसकावून लावू नये असा निरंतर मनाई हुकूम पारीत होऊन दावा मंजूर करण्यात आलेचे दिसते.

**१५.** प्रस्तुतचा अर्ज दरखास्तदार यांनी त्यापैकी गट नं. ३३२/1 मधील त्यांचे हिश्याचे क्षेत्रात जाबदार यांनी बसविलेली १० एच.पी. मोटार, त्यासाठी विद्युत पुरवठा करणेस बसविलेला खांब व त्यावरील पेटी जाबदार यांनी काढून घ्यावी व त्यांनी दि. २७/०२/२००४ रोजीचे मनाई आदेशाचा भंग केल्यामुळे त्यांना दिवाणी तुरुंगात ठेवणेबाबत तसेच त्यांची मिळकत जप्त करुन विक्री करणेबाबत आदेश होणेकरीता दिलेला आहे. याठिकाणी जाबदार यांचेविरुध्द वर नमूद मोटार, खांब व पेटी काढून घेणेबाबत आदेश करता येईल का तसेच जाबदार यांनी दि. २७/०२/२००४ रोजीचे मनाई आदेशाचा भंग केला का हे पाहणे आवश्यक आहे.

**१६.** दरखास्तदार यांनी त्यांचे अर्जात कथन केल्याप्रमाणे दि. २७/०२/२००४ रोजीचे हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणेसाठी रे.द.नं. २८/२००४ ची दरखास्त दाखल केली होती व त्याकामी दि. ०२/०४/२००५ रोजी तालुका भूमी अभिलेख यांनी वाटप करुन दि. २४/११/२००५ रोजी वाटप तक्ता तयार केला. त्यानुसार तहसिलदार शिराळा यांच्याकडे वाटप केस नं. १२/२००५ चे काम चालून दि. ०९/०८/२००६ रोजी वाटप तक्त्याप्रमाणे वाटप मंजूर करण्यात आले. त्यानुसार कब्जेपट्टी तयार करण्यात आली. दरखास्तदार यांनी त्यांचे सदर कथनांपृष्ठ्यर्थची सर्व कागदपत्रे प्रकरणात दाखल केलेली आहेत. दरखास्तदार यांनी कब्जेपट्टी तसेच त्याअनुषंगाने झालेला फेरफार नं. ७८६५

प्रकरणात दाखल केलेला आहे त्याची पाहणी करता कब्जेपट्टीप्रमाणे त्या-त्या जमीनीचा कब्जा वादी यांना देण्यात आल्याचे त्यात नमूद केल्याचे दिसते. परंतु, त्यामध्ये कोणाला किती क्षेत्र दिले अथवा चतुःसिमापूर्वक क्षेत्राचा कब्जा दिल्याचे नमूद केल्याचे दिसत नाही.

**१७.** दरखास्तदार यांना त्यांचे हिश्याचे क्षेत्राचा चतुःसिमापूर्वक कब्जा दिल्याबाबत कोणताही पुरावा समोर आलेला नाही. याउलट, दरखास्तदार यांनी नि.क्र. २३ लगत अर्ज देऊन वाटप मोजणी नकाशा, कब्जेपट्टी इत्यादी कागदपत्रांमधील अनियमितता, चुका, हस्तदोष दुरुस्त करण्यात याव्यात व वाटप तक्त्यामध्ये दरखास्तदार यांचे हिश्याचे दावा मिळकतीमधील ११/५० हिस्सेप्रमाणे क्षेत्र नमूद करण्याबाबत उपअधिक्षक, भूमिअभिलेख शिराळा व तहसिलदार शिराळा यांना आदेश व्हावा असा अर्ज दि. २७/०२/२०२३ रोजी दिलेला आहे. यावरुन देखील केवळ वाटपतक्त्याप्रमाणे कब्जेपट्टी कागदोपत्री तयार केल्याचे प्रथमदर्शनी दिसते, पण त्यामध्ये क्षेत्र नमूद केल्याचे दिसत नाही. त्यामुळे कब्जाची प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याचे दिसते. तरी देखील दरखास्तदार यांनी अर्जात त्यांचा हिस्सा, क्षेत्र चतुःसिमापूर्वक नमूद केले आहे ते कशाच्या आधारे केले याचा कोणताही पुरावा समोर आलेला नाही. एकंदर कागदपत्रांवरुन कब्जाची प्रक्रिया पूर्ण न झालेने मिळकतीचा ताबा हा दरखास्तदार व जाबदार यांचा एकत्रीत/समाईकात असा आहे. त्यामुळे दरखास्तदार यांना त्यांचे क्षेत्राचा चतुःसिमापूर्वक कब्जा मिळाल्याचे त्यांचे कथन स्विकारण्याजोगे नाही.

**१८.** वर नमूद केल्याप्रमाणे कब्जाची प्रक्रिया पूर्ण न झालेने मिळकतीचा ताबा हा दरखास्तदार व जाबदार यांचा एकत्रीत/समाईकात असल्यामुळे दरखास्तदार व जाबदार हे

अद्याप मिळकतीत सहदायक आहेत. त्यामुळे प्रस्तुत दरखास्तचे कामी जाबदार यांनी मोटार, खांब, पेटी काढून घ्यावी असा आदेश त्यांचेविरुध्द देता येणार नाही. रे.दि.मु.नं. १३०/२००१ मधील दि. २७/०२/२००४ रोजीचे न्यायनिर्णयाप्रमाणे प्रतिवादींनी वादीला आऊस्ट करु नये अशी ताकीद दिलेली आहे. जाबदार यांनी त्यानंतर दरखास्तदार यांना आऊस्ट करण्याचा प्रयत्न केला असता तर मनाई आदेशाचा भंग झाला असता. मात्र, जाबदार यांनी तसा प्रयत्न केल्याचे दरखास्तदार यांचे कथन नाही. जाबदार यांनी दि. २७/०२/२००४ रोजीचे मनाई आदेशाचा भंग केल्याबाबत कोणताही पुरावा समोर आलेला नाही. त्यामुळे त्यांना दिवाणी तुरुंगात ठेवणेचा अगर त्यांची मिळकत जप्त करुन विक्री करणेबाबतचा आदेश करता येणार नाही. एकंदर सर्व विवेचनावरुन दरखास्तदार यांचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. करीता आदेश.

## आदेश

दरखास्तदार यांचा अर्ज नि.क्र. ५ नामंजूर करण्यात येतो.

DESAI VINAYA ATMARAM
Digitally signed by DESAI VINAYA ATMARAM
Date: 2025.04.29 16:03:44 +0530

शिराळा (श्रीमती व्ही. ए. देसाई)
दिनांक २८/०४/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,शिराळा

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M. S. Gondkar |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 28/04/2025 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 29/04/2025 |
| Order uploaded on | : | 29/04/2025 |